# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

**महत्वाचे**

**जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११वी प्रवेश/पुवि/२०१७/** 1362४
दिनांक :- 6 JUN 2017

**प्रति,**

**सर्व प्राचार्य,**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

विषय :- **इन कोटयातील आपल्या संस्थेच्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये**

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
**३) या कार्यालयाचे पत्र दिनांक ०६.०३.२०१७.**

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश-२०१७-१८ चे कामकाज पुणे व पिंपरी चिंचवड, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थी अर्ज करत आहेत व काही विद्यार्थ्यांना इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशामधून इनहाऊस कोटयात प्रवेश घ्यावयाचा असतो. त्यासाठी या पत्रासोबत जोडलेल्या यादीमध्ये कॉलेज रजिस्ट्रेशनच्या वेळी विहित फॉरमॅट मध्ये आपल्या संस्थेच्या सर्व मंडळाच्या (उदा- एसएससी, सीबीएसई, आयसीएसई व इतर ) माध्यमिक शाळांची नांवे तपासून घ्यावीत. तसेच आपल्या संस्थेतर्गंत येणा-या पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयाची नांवे समाविष्ट आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन जर आपल्या संस्थेच्या **माध्यमिक शाळेचे कोणत्याही बोर्डाचे नांव** असले तरीही या यादीत समाविष्ट नसेल तर आपल्या संस्थेच्या माध्यमिक शाळेचे नांव समाविष्ट करण्यासाठी **दि.०७.०६.२०१७** व **०८.०६.२०१७** रोजी **शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयात सकाळी ११.०० ते ५.०० या** वेळेत सर्व कागदपत्राच्या पुर्ततेसह नस्ती सादर करुन समक्ष नोंदणी करुन घ्यावी. सदर नोंदणी यादी उपस्थित न राहील्यास इ.११ वी ऑनलाईन प्रवेशातुन इनहाऊस कोटयातुन विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्यास याबाबत प्राचार्य यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपल्या संस्थेच्या इनहाऊस कोटयासाठी नोंदणी झालेल्या शाळांची यादी इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावरील होम पेजवर प्रसिध्द केली जाईल.

**सोबत :- इनहाऊस शाळांची यादी.**

MRaut 6.6.17
(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे